# राज्य परिवहन प्राधिकरण, महाराष्ट्र राज्य, मुंबई.

प्रधान सचिव (परिवहन) तथा अध्यक्ष, राज्य परिवहन प्राधिकरण, महाराष्ट्र राज्ययांच्या अध्यक्षतेखाली त्यांचे मंत्रालयातील कार्यालयीन दालनात दिनांक १५.०६.२०१८ रोजी दुपारी १२.०० वाजता घेण्यात आलेल्या राज्य परिवहन प्राधिकरण, महाराष्ट्र राज्य, यांच्या २६२ व्या बैठकीचे इतिवृत्त पुढे नमुद केल्याप्रमाणे आहे :

सदर बैठकीस राज्य परिवहन प्राधिकरणाचे पुढे नमुद केल्याप्रमाणे अध्यक्ष व सदस्य उपस्थित होते.

| | | |
|---|---|---|
| १. | श्री. मनोज सौनिक, भा.प्र.से.<br>प्रधान सचिव (परिवहन),<br>महाराष्ट्र राज्य, मुंबई | अध्यक्ष,<br>राज्य परिवहन प्राधिकरण |
| २. | श्री. शेखर चन्ने, भा.प्र.से.<br>परिवहन आयुक्त,<br>महाराष्ट्र राज्य, मुंबई. | सदस्य,<br>राज्य परिवहन प्राधिकरण |
| ३. | श्री. आर.के.पद्मनाभन, भा.पो.से.<br>अपर पोलिस महासंचालक (वाहतुक),<br>महाराष्ट्र राज्य, मुंबई. | सदस्य,<br>राज्य परिवहन प्राधिकरण |
| ४. | श्री. स. बा. सहस्त्रबुध्दे<br>अपर परिवहन आयुक्त,<br>महाराष्ट्र राज्य, मुंबई. | सचिव,<br>राज्य परिवहन प्राधिकरण |

**बाब क्रमांक :- १**

**विषय :-** **दिनांक १९.०१.२०१८ रोजी संपन्न झालेल्या राज्य परिवहन प्राधिकरण, महाराष्ट्र राज्य, मुंबई यांच्या २६१ व्या बैठकीच्या इतिवृत्तास मान्यता देण्याबाबत.**

दिनांक १९.०१.२०१८ रोजी घेण्यात आलेल्या राज्य परिवहन प्राधिकरणाच्या २६१ व्या बैठकीचे इतिवृत्तास मान्यता देऊन सदर इतिवृत्त प्राधिकरणाने कायम केले.

**बाब क्रमांक :- २**

**विषय :-** **दिनांक १९.०१.२०१८ रोजी घेण्यात आलेल्या राज्य परिवहन प्राधिकरण, महाराष्ट्र राज्य यांच्या २६१ व्या बैठकीतील निर्णयांवर करण्यात आलेल्या कार्यवाहीच्या प्रगतीचा आढावा घेणे.**

राज्य परिवहन प्राधिकरणाने दिनांक १९.०१.२०१८ रोजी घेण्यात आलेल्या राज्य परिवहन प्राधिकरण यांच्या २६१ व्या बैठकीतील निर्णयांवर करण्यात आलेल्या कार्यवाहीच्या प्रगतीचा आढावा घेतला.



Scanned by CamScanner

**बाब क्रमांक :- ०३**

**विषय:- महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन महामंडळ, मुंबई यांना टप्पा वाहतुक सेवांच्या भाडयांमध्ये आपोआप भाडेवाढ करण्यास परवानगी मिळण्याबाबत**

राज्य शासनाने महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन महामंडळाला शासन निर्णय क्रमांक एमटीसी-१०९९/४५१/प्र.क्र.२१/परि-१ दिनांक १६.०४.१९९९ अन्वये कर्मचा-यांच्या महागाई भत्यात वाढ झाल्यास व इंधन, टायर, ट्यूब, चेसीस इत्यादी मूलभूत घटकांच्या किंमतीमध्ये वाढ झाल्यास प्रवासी भाड्यात वाढ करता येईल असा निर्णय घेतला आहे. तथापी, मूळ पगार आणि निर्धारीत स्वरुपाच्या इतर बाबींमध्ये काहीही बदल झाल्यास बस भाडयामध्ये आपोआप सुधारणा करण्याची गरज नाही.

उपरोक्त शासन निर्णयातील सुत्रानुसार महामंडळाला प्रवासी भाडयात वाढ करता येईल. तथापी, यापेक्षा जादा भाडे वाढ करावयाची असल्यास त्याकरीता शासनाची वेगळी मान्यता घेण्याचे बंधन महामंडळावर राहील. त्याचप्रमाणे, वरील सूत्रामध्ये ज्याबाबींचा समावेश नाही अशा कारणांसाठी वाढ करावयाची झाल्यास त्याकरीताही महामंडळाला शासनाची पूर्व परवानगी घेण्याचे बंधन राहिल.

महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन महामंडळाने प्रवासी भाडयात वाढ साधारणत: सप्टेंबर-ऑक्टोबर महिन्यात करावी असेही सदर शासनाचे आदेश आहेत.

शासन निर्णय क्रमांक एमटीसी-१०९९/४५१/प्र.क्र.२१/परि-१ दिनांक १६.०४.१९९९ च्या तरतूदी विचारात घेऊन राज्य परिवहन प्राधिकरणाने दिनांक २९.०१.२०१४ रोजीच्या बैठकित ठराव क्र.०७/२०१४ अन्वये केवळ डिझेलच्या किंमतीत वाढ झाल्यास महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन महामंडळास दिनांक २१.१२.२०१४ पर्यंत आपोआप भाडेवाढ करण्यास परवानगी देण्याचा निर्णय घेतला. त्याअनुषंगाने शासन निर्णय गृहविभाग क्र.एमटीसी-१०९९/४५१/सीआर-२१/टीआरए-१ दिनांक १६.०४.१९९९ मध्ये विहित केलेल्या सुत्रानुसार विविध सेवांचे भाडे राज्यात दिनांक २२.०८.२०१४ पासून लागू आहे.

उपाध्यक्ष व व्यवस्थापकिय संचालक, महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन महामंडळ यांनी त्यांच्या दिनांक १२.०६.२०१८ च्या पत्रान्वये कर्मचाऱ्यांच्या वेतनात वाढ व महामंडळाच्या बसेसना चलनासाठी आवश्यक असलेल्या घटकांच्या किंमतीत बदल



Scanned by CamScanner

झाल्यामुळे आपोआप दरवाढीच्या सूत्रानुसार भाडेवाढ करण्यास भाडेदर पत्रक जोडून प्रस्ताव सादर केला आहे.

राज्य परिवहन प्राधिकरणाने विषयसूचीचे अवलोकन केले व महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन महामंडळ यांनी दिनांक १२.०६.२०१८ च्या पत्रान्वये सादर केलेल्या भाडेवाढीच्या प्रस्तावास मंजुरी दिली तथापि त्यातील वेतनामुळे होणारी भाडेवाढ ही शासन मान्यतेच्या अधिन राहून देण्यात येत आहे असे प्राधिकरणाने निर्देश दिले.

**(रा.प.प्रा.म.रा.मुंबई, बैठक दिनांक १५.०६.२०१८ ठराव क्र.०९/२०१८)**

**स.बा.सहस्त्रबुध्दे**
**सचिव,**
**राज्य परिवहन प्राधिकरण**
**तथाअपर परिवहन आयुक्त,**
**महाराष्ट्र राज्य, मुंबई.**

**श्री. शेखर चन्ने, (भा.प्र.से)**
**सदस्य,**
**राज्य परिवहन प्राधिकरण,**
**तथा परिवहन आयुक्त,**
**महाराष्ट्र राज्य, मुंबई.**

**श्री. आर.के.पद्मनाभन ( भा.पो.से.)**
**सदस्य,**
**राज्य परिवहन प्राधिकरण**
**तथा अपर पोलीस महासंचालक (वाहतूक),**
**महाराष्ट्र राज्य, मुंबई.**

**श्री. मनोज सौनिक,(भा.प्र.से)**
**अध्यक्ष,**
**राज्य परिवहन प्राधिकरण,**
**तथा अपर मुख्य सचिव, गृह विभाग (परिवहन),**
**महाराष्ट्र राज्य, मुंबई.**

Scanned by CamScanner